| MHKO050021292019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | ०८/०५/२०१९. | | |
| | नोंदणी दिनांक | :- | ०८/०५/२०१९. | | |
| | निकाल दिनांक | :- | ०८/०७/२०२६. | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | :- | ०७ | ०२ | ०० |

**इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी आर. डी. खराटे.)

न्यायनिर्णय अधिघोषित दि.०८ जुलै, २०२६.

**नियमित फौजदारी खटला क्र.७६/२०१९.** **नि.क्र.३९.**

शहापूर पोलिस ठाणे, इचलकरंजी, गुन्हा नोंद क्र.६८/२०१९, भा.दं.वि.सं. कलम ४२० व ५११ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| वर्दीदार | | महाराष्ट्र शासन मार्फत शहापूर पोलिस ठाणे, इचलकरंजी. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.शेटे. |
| आरोपी | | **दिपक नथुराम पोवार,**<br>व.व.३५, व्यवसाय – कॉन्ट्रॅक्टर,<br>रा.राजेश्वरी नगर, इचलकरंजी,<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ | | श्री.एल.डी.मुजावर. |

**भाग-ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | दि.२६/०३/२०१९ व दि.०१/०४/२०१९ |
| वर्दी दाखल दिनांक | ०१/०४/२०१९. |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०६/०५/२०१९. |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | २७/०६/२०२२. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२/०९/२०२२. |
| पुरावा संपल्याचा दिनांक | ०६/०७/२०२६. |
| फौ.प्र.सं.कलम ३१३ चे निवेदन नोंदविल्याचा दिनांक | नोंदविले नाही. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | - |
| न्यायनिर्णय दिनांक | ०८/०७/२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक. निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिपक नथुराम पोवार | ०१/०४/१९ | ०४/०४/१९ | भा.दं.वि.सं. कलम ४२० व ५११ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग-क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षिदार/बचाव पक्षातर्फे साक्षिदार/न्यायालयीन साक्षिदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षिदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी विष्णू तिवडे | घटनास्थळ पंच | १३ |
| २. | सुशांत सुनिल नगरकर | अंगझडती व जप्ती पंच | २८ |
| ३. | इब्राहिम अलीम शहाआलासी | फिर्यादी | ३६ |

**ब. बचाव पक्ष**

| सा.क्र. | साक्षिदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | काही नाही. | - | - |

**क. न्यायालयाने तपासलेले साक्षिदार**

| सा.क्र. | साक्षिदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | काही नाही. | - | - |

**ड. भिस्त ठेवलेले न्यायनिर्णय**

| |
|---|
| **काही नाही.** |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २९ | अंगझडती व जप्ती पंचनाम्यावरील सही. |
| २. | ३५ | फिर्यादी व आरोपीतर्फे तडजोड अर्ज. |
| ३. | ३७ | फिर्यादीवरील सही. |
| ४. | ३८ | फिर्यादीतर्फे पुरावा बंद व तडजोड पुरसिस. |

**-न्या य नि र्ण य-**

( दि.०८ जुलै, २०२६ रोजी अधिघोषित.)

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द भा.दं.वि.कलम ४२० व ५११ अन्वये चालविण्यात आला.

<u>अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की</u>,

२. दि.२६/०३/२०१९ रोजी १४.४५ वाजता व दि.०१/०४/२०१९ रोजी १२.०० वाजताचे सुमारास कोरोची गांवातील पंचगंगा साखर कारखाना ते कोरोची रस्त्याच्या पुर्वेस तीन विहिरीजवळ असलेल्या गोल्डन ज्वेलर्स दुकानामध्ये, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे सदरची घटना घडली. दि.२६/०६/२०१९ रोजी वर नमूद वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्याकडील नंबर नसलेल्या करिझ्मा आर मोटारसायकलवरुन येऊन तांब्यांच्या अंगठीस सोन्याचे पाणी दिलेल्या अंदाजे ८.५ ग्रॅम वजनाच्या दोन बनावट अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे फिर्यादीस भासवून व त्या मोडीत देऊन रक्कम रुपये २०,५००/- स्विकारले. तसेच दि.०१/०४/२०१९ रोजी आरोपीने त्याच्याकडील नंबर नसलेल्या करिझ्मा आर मोटारसायकलवरुन येऊन फिर्यादीस चांदीच्या अंगठीस सोन्याचे पाणी दिलेले दोन बनावट अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे भासवून पैशांची मागणी केली व फिर्यादीची फसवणूक केली. त्यामुळे फिर्यादीने शहापूर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवली.

३. सदर फिर्यादीवरुन गु.र.क्र.६८/२०१९ हा भा.द.वि. कलम ४२० व ५११ अन्वये नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ.श्री.पी.बी.पाटील यांनी केला. त्यांनी तपासामध्ये आरोपीला अटक केली, घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, साक्षिदारांचे तपासटिपण नोंदवले व आरोपी विरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. दि.२७/०६/२०२२ रोजी आरोपी विरुध्द भा.दं.वि.कलम ४२० व ५११ अन्वये दोषारोप **नि.क्र.११** नोंदवून तो त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपी विरुध्द सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. फिर्यादी पक्षाचा पुरावा व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, दि.२६/०३/२०१९ रोजी १४.४५ वाजता व दि.०१/०४/२०१९ रोजी १२.०० वाजताचे सुमारास कोरोची गांवातील पंचगंगा साखर कारखाना ते कोरोची रस्त्याच्या पुर्वेस तीन विहिरीजवळ असलेल्या गोल्डन ज्वेलर्स | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | दुकानामध्ये, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याच्याकडील नंबर नसलेल्या करिझ्मा आर मोटारसायकलवरुन येऊन फिर्यादीस तांब्यांच्या अंगठीस सोन्याचे पाणी दिलेल्या अंदाजे ८.५ ग्रॅम वजनाच्या दोन बनावट अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे भासवून व त्या मोडीत देऊन रक्कम रुपये २०,५००/- स्विकारले व आरोपीने फिर्यादीस चांदीच्या अंगठीस सोन्याचे पाणी दिलेले दोन बनावट अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे भासवून फिर्यादीकडे पैशांची मागणी केली व फिर्यादीची फसवणूक केली ? | |
| २. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस तांब्याच्या व चांदीच्या अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे भासवून त्या विकण्यासाठी फिर्यादीला फसविण्याचा आणि अप्रामाणिकपणे प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला ? | **नकारार्थी.** |
| ३. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ व २ साठी</u> -**

मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची चर्चा एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

६. अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.१ घटनास्थळ पंच शिवाजी विष्णू तिवडे यांच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले आहे की, दि.०१/०४/२०१९ रोजी शहापूर पोलिसांनी त्यांना बोलविले नव्हते. असे काही घडले नाही की, सदर दिवशी घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी पोलिसांनी त्यांना बोलविले होते. पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहिती नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत होईल अशी साक्ष न दिल्याने सदर साक्षिदाराचा उलटतपास घेतला परंतु, सदर साक्षिदाराने उलटतपासात देखील अभियोगपक्षास मदत होईल असे कोणतेही कथन केले नाही.

७. अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.२ अंगझडती व जप्ती पंच सुशांत सुनिल नगरकर यांच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले आहे की,

दि.०१/०४/२०१९ रोजी ते त्यांच्या कामानिमित्त शहापूर पोलिस ठाणे येथे गेले होते. तेथे पोलिसांनी त्यांची को-या कागदावर सही घेतली. परंतु, पोलिसांनी त्यांच्या समक्ष अंगझडती व जप्ती पंचनामा केला नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत होईल अशी साक्ष न दिल्याने सदर साक्षिदाराचा उलटतपास घेतला परंतु, सदर साक्षिदाराने उलटतपासात देखील अभियोगपक्षास मदत होईल असे कोणतेही कथन केले नाही.

८. अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.३ फिर्यादी इब्राहिम अलीम शहाआलासी यांच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांचे सोनाराचे दुकान असून आरोपी हे त्यांचे गि-हाईक असल्यामुळे ते त्यांना ओळखतात. आरोपी हा त्यांची पाठीमागची उधारी देत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये बाचाबाची झाली होती. त्यामुळे त्यांनी रागाच्या भरात आरोपी विरुध्द फिर्याद दिली. फिर्यादीतील मजकूर त्यांना माहिती नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत होईल अशी साक्ष न दिल्याने सदर साक्षिदाराचा उलटतपास घेतला परंतु, सदर साक्षिदाराने उलटतपासात देखील अभियोगपक्षास मदत होईल असे कोणतेही कथन केले नाही.

९. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता साक्षिदार क्र.१ घटनास्थळ पंच शिवाजी तिवडे व साक्षिदार क्र.२ अंगझडती व जप्ती पंच सुशांत नगरकर यांनी त्यांच्या सरतपासात त्यांच्या समक्ष पंचनामा झाला नसल्याचे कथन करुन त्यांच्या जबाबावरुन पाठ फिरविलेली आहे व अभियोगपक्षाच्या हकीकतीस दुजोरा दिलेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणातील सर्वात महत्वाचा साक्षिदार म्हणजेच साक्षिदार क्र.३ फिर्यादी इब्राहिम अलीम शहाआलासी यांनी अभियोगपक्षाच्या कथनांना दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे फिर्याद सिध्द होऊ शकली नसल्याने अभियोगपक्षाच्या मुळ गाभ्याचा घात झाला आहे. तसेच फिर्यादीने आरोपी व फिर्यादी मध्ये तडजोड झाल्याबाबत कथन करुन तसे तडजोड पत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्यादीचे अवलोकन करता घटनेच्यावेळेस आरोपीने त्याच्याकडील नंबर नसलेल्या करिझ्मा आर मोटारसायकलवरुन येऊन फिर्यादीस तांब्यांच्या व चांदीच्या अंगठीस सोन्याचे पाणी दिलेल्या अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे भासवून त्या अंगठ्या मोडीत देऊन स्विकारली व फिर्यादीकडे पैशांची मागणी केली. तसेच आरोपीने फिर्यादीस तांब्याच्या व चांदीच्या अंगठ्या ह्या सोन्याच्या अंगठ्या आहेत असे भासवून त्या विकण्यासाठी फिर्यादीला अप्रामाणिकपणे प्रवृत्त करण्याचा व फसविण्याचा प्रयत्न केला या बाबी निःसंशय सिध्द होऊ शकल्या नाहीत. याव्यतिरिक्त येथे नमूद करणे गरजेचे आहे की, फिर्यादी व आरोपी यांनी **नि.क्र.३५** वर प्रकरण तडजोड करण्यासाठी अर्ज दाखल करुन फिर्यादी यांनी **नि.क्र.३८** वर सदरची केस फिर्यादीस चालवायची नसल्याबाबत पुरसिस दाखल केली आहे. त्यामुळे

आरोपींवरील आरोप संशयापलीकडे जाऊन सिध्द होऊ शकलेले नाहीत. सदर खटला जरी **फौ.प्र.सं.चे कलम ३२०** प्रमाणे तडजोडीस पात्र नसला तरी एकदंरीत खटल्याचे स्वरुप व उभय पक्षांमधील संबंध पाहता सामाजीक ऐक्य राहण्याचे दृष्टीने अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे एकंदरीत साक्षीपुराव्याचा विचार करताना आरोपी विरुध्द दोष ठेवण्याइतपत पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे **मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष मी नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत</u> -**

**१०.** वरील सर्व विवेचनांवरुन मी या निष्कर्षावर आले आहे की, अभियोगपक्ष आरोपींचा गुन्हा नि:संशय सिध्द करण्यास असमर्थ ठरले आहे. सबब, आरोपी हे संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. त्याकरीता आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम ४२० व ५११ गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्त करणे न्यायोचीत होईल. सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तरादाखल पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. **आरोपी दिपक नथुराम पोवार** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.कलम ४२० व ५११ प्रमाणेच्या गुन्ह्यांतून निर्दोष मुक्तता केली आहे.

२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ नुसार रक्कम रुपये १५,०००/- चा जामीन कदबा या न्यायालयात सादर करावा.

४. जप्त मुद्देमाल मु.र.क्र.०८/२०१९ सोन्याच्या चार बिल्वर त्याचे वजन ४६ ग्रॅम, चांदीची तीन बिस्किटे व एक कॉईन त्याचे वजन ४५ ग्रॅम ८४० मिली, होंडा कंपनीची करिझ्मा आर मोटारसायकल त्याचा चेसीस क्र.MBLMC38EFDGBO1559 व इंजिन क्र.MC38EDDGBO1504 हे वाहन व जप्त मुद्देमाल मु.र.क्र.०९/२०१९ रोख रक्कम रुपये २०,५००/- हा मुद्देमाल यापुर्वीच त्यांच्या मुळ मालकास परत केले असल्याने अपील कालावधीनंतर सदरचा आदेश कायम करण्यात येतो.

**५.** जप्त मुद्देमाल मु.र.क्र.०८/२०१९ सोन्याचा मुलामा दिलेल्या चार बांगड्या त्यातील एक कट केलेली व सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे पाच वळे त्याचे एकूण वजन ७५ ग्रॅम ५९० मिली, सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे दोन वाळे त्याचे वजन ९ ग्रॅम १८० मिली व ६ पिवळ्या रंगाचे तांब्याचे बारीक तुकडे त्याचे वजन ४ ग्रॅम ९० मिली हा मुद्देमाल जाहीर लिलावामध्ये विक्री करावा व त्यापासून मिळणारी रक्कम शासन जमा करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.08 18:07:16 +0530

दि.०८/०७/२०२६.

**(आर. डी. खराटे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी.